**विषयः**- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. (विविध विषयानुसार दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत निर्बंध (बंदी) घालण्यात आलेली याद्वारे पुढील आदेशापर्यंत कायम ठेवणेबाबत.)

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
क्र.२०२०/आरबी-१/डे-२/टे-४ /कोरोना/सीआर-
दि. ३१/०३/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.
४) या कार्यालयाचे समक्रमांकीत पत्र/आदेश दि.१५.०३.२०२०, दि.१६.०३.२०२०, दि.१७.०३.२०२०, दि.१८.०३.२०२०, दि.१९.०३.२०२०, दि.२०.०३.२०२०, दि.२१.०३.२०२०, दि.२२.०३.२०२०, दि.२३.०३.२०२०
५) या कार्यालयाचे फौजदारी संहिता दंडप्रकियेचे कलम १४४ चे आदेश क्र.२०२०/आरबी-१ /डेस्क-२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र. दि.२५.०३.२०२०

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि त्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भ क्र.४ अन्वये नांदेड जिल्हयातील खालील विषयनिहाय बाबी दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवण्याचे आदेशित करण्यात आले होते.

तथापि, संदर्भ क्र.०५ वरील आदेशान्वये, संपूर्ण नांदेड जिल्हयात फौजदारी संहिता दंडप्रकियेचे कलम १४४ अन्वये, प्रतिबंधात्मक आदेश पारीत करण्यात आले आहेत. त्यामुळे खालील बाबीनुसार दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवण्यात आलेले आदेश पुढील आदेशापावेतो कायम राहतील.

१) शाळा / महाविद्यालय / शैक्षणिक संस्था बंद ठेवणे बाबत.
२) खाजगी शिकवणी (Coaching Classes) अभ्यासिका केंद्र बंद ठेवणे बाबत.
३) शहरी हद्दी लगतच्या शैक्षणिक संस्था बंद ठेवणे बाबत.
४) नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातील सर्व शासकीय व खाजगी शैक्षणिक संस्था बंद ठेवणे बाबत.

Scanned by CamScanner

५) महानगरपालिका व सर्व नगरपालिका, सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी अंगणवाडया बंद ठेवणे बाबत.

६) चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा, नाटयगृह, म्युझियम बंद ठेवणेबाबत.

७) शॉपिंग मॉल बंद करणे बाबत.

८) आठवडी बाजार बंद करणे बाबत.

९) कार्यालयात बैठका व अभ्यांगतांच्या भेटी नियंत्रित करणे बाबत.

१०) नांदेड जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील अंगणवाडया बंद ठेवणे बाबत.

११) आधार केंद्र बंद ठेवणे बाबत.

१२) नांदेड जिल्हयातील सर्व बँकातून अनुदान व पिक विमा वाटप बंद ठेवणे बाबत.

१३) नांदेड जिल्हयातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयातील दस्त नोंदणीचे काम बंद ठेवणे बाबत.

तसेच, यापूर्वी या कार्यालयाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निर्देश व परिपत्रके या आदेशासह अमंलात राहतील.

तसेच, सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधिताविरुध्द भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी - आवश्यक कार्यवाहीस्तव**

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
५. पोलीस अधिक्षक, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
९. सर्व समन्वय अधिकारी (नोडल अधिकारी)
१०. जिल्हा माहीती अधिकारी नांदेड
११. केंद्र संचालक आकाशवाणीकेंद्र नांदेड यांना प्रसिध्दीस्तव.

OFFICE OF THE COLLECTOR NANDED.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned by CamScanner